शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
ज्ञानमेवामृतम्

**Estd: 1962**
**NAAC "A++" Grade**

## :: परिपत्रक ::

शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मधील एमफिल/प्री-पीएचडी कोर्सवर्क थेअरी परीक्षा मार्च/मे २०२१ च्या अनुषंगाने अभियांत्रिकी विद्याशाखा वगळून इतर सर्व विद्याशाखांमधील संबंधित विद्यार्थ्यांनी काही तांत्रिक कारणांमुळे ऑफलाईन अर्ज सादर केले आहेत. विद्यार्थ्यांनी अर्जामध्ये नमूद केलेल्या फोन नंबरवरती विद्यापीठाकडून ऑनलाईन नोंदणी करण्याकरिता संदेश व नोंदणीसाठी लिंक पाठविण्यात येईल. त्यानंतर सदरचे अर्ज संगणक प्रणालीत नोंदविणेचे आहेत.

या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी त्यांना प्राप्त लिंकनुसार आपली नोंदणी करणे अनिवार्य आहे. या संबंधाने विद्यापीठ सर्व अधिविभाग, संलग्नित सर्व संशोधन केंद्रे यांनी आपल्याकडे असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन नोंदणीबाबत योग्य ती कार्यवाही सत्वर करावी. काही विद्यार्थ्यांनी अर्जामध्ये फोन नंबर नमूद केलेले नसल्याने अशा विद्यार्थ्यांना लिंक प्राप्त होणार नाही. सबब, सदर विद्यार्थ्यांना आपल्याकडील नोंदीनुसार याबाबत आपल्या स्तरावरून अवगत करून सदर विद्यार्थ्यांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी. या संदर्भात काही अडचण निर्माण झाल्यास अथवा अधिकची माहिती आवश्यक असल्यास ०२३१-२६०९३३५/९११८ या क्रमांकावर संपर्क साधावा.

सदरची ऑनलाईन नोंदणी फक्त मार्च/मे २०२१ च्या उन्हाळी परीक्षा प्रथमतः देणाऱ्या (Fresh) विद्यार्थ्यांनी करणेची आहे. यापूर्वी अनुत्तीर्ण झाल्यामुळे ही परीक्षा देणाऱ्या (Repeater) विद्यार्थ्यांचे मॅन्युअल परीक्षा अर्ज पूर्वीप्रमाणेच स्वीकारले जातील.

बीएस्सी/एमएस्सी परीक्षा विभाग/१२८
दि. २६.०८.२०२१

**प्र. संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**